| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 930 /२०२४ दि. 09/०८/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, उल्हासनगर** वाहतूक उपविभागाचे हद्‌दीत कल्याण निर्मळ रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ वरील शहाड रेल्वे स्टेशन उडड्‌डाणपुलावर उल्हासनगर कडून कल्याण कडे जाणा–या मार्गिकेवर डेक स्लॅबवर खडड्‌ा पडला असून त्या भागाचे कॉक्रीट सतत पडत असल्याने सदर मार्गिका जड अवजड वाहनाकरीता बंद करण्यात यावी असे जा.क्र.रामउपविभाग/ठाणे/प्रशा/४११, दि. ०१/०८/२०२४ रोजी उपविभागीय अभियंता राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, ठाणे यांचे पत्र प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने सदर शहाड रेल्वे स्टेशन उडड्‌डाणपुलावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी व वाहतुक सुरळीत, सुरक्षित राहावी यास्वत जड अवजड वाहनांसाठी बंद केल्यास नागरिकांचे सोईचे होईल.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** मुरबाड कडून उल्हासनगर कल्याण कडे येणा–या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना उल्हासनगर वाहतूक उपविभाग हददीत **म्हारळ नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – मुरबाड कडून कल्याण दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना कल्याण तालुका पोलीस स्टेशन हद्‌दीत गोवेली गाव येथून डावीकडे वळून गोवेली – टिटवाळा – आंबिवली – कल्याण मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. ०१/०८/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजेपासून सदर काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत :–** पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :–** सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी वाहतूक शाखा.

२/– म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.